# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय , विरार पुर्व, जि.पालघर , जि.पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५०१/०२/०३/०४/०५/०६ , फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५२८ | विभाग :- आस्थापना (मु.)
दिनांक :- ०३/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय** :- मे.सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना मुदत वाढ देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडुन डिसेंबर २०१५ ते २०१६ कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन अदा करण्यास व अतिरिक्त सुरक्षा रक्षक घेऊन प्रभाग समिती कार्यालयाना पुर्णवेळ सुरक्षा रक्षक पुरविण्याचे निर्देश दिलेले होते. त्या सोबतच त्याकामी होणाऱ्या वाढीव खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.यांनी दि. १९/०८/२०१६ रोजी करारनामा केलेला आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना त्यांच्या मार्फत कार्यरत असलेल्या १५४ ठेका सुरक्षा रक्षकांपैकी ५० सुरक्षा रक्षक कमी करण्याचे पत्र दिलेले आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. मधुन सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे जेवढे सुरक्षा रक्षक नोंदणी होतील तेवढे सुरक्षा रक्षक मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचे ठेक्यातुन कमी करण्याचे मान्यता दिलेली आहे.

मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडील ३५ सुरक्षा रक्षक हे सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदींत झाल्याकारणाने त्यांच्याकडील कार्यरत असणाऱ्या १०४ सुरक्षा रक्षकांमधुन ३५ सुरक्षा रक्षक कमी करण्याचे पत्र दिलेले आहे.

**सध्यास्थितीमध्ये** मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडे ६९ सुरक्षा रक्षक (महिला/पुरुष) कार्यरत आहेत. . मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचा ठेका ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंतच ठेवण्यात यावा व दि. ०१ जानेवारी, २०२२ पासुन त्यांचा ठेका बंद करण्यात यावा, असे स्पष्ट नमुद आहे. त्याचप्रमाणे मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि.मधील जे सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत होतील त्यांचे वेतन सदरच्या मंडळामार्फत अदा केले जाईल व जे सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा त्यांचेकडे नोंदीत न झाल्यास सदरच्या कर्मचाऱ्यांची राहील, असा प्रशासकीय ठराव पारित केलेला आहे.

तरी मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचेकडे कार्यरत असलेल्या ६९ सुरक्षा रक्षकांपैकी किती सुरक्षा रक्षक महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत होणार आहेत . याबाबत महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांना पत्र देणे आवश्यक वाटते. सदरहु ६९ सुरक्षा रक्षकांपैकी जे सुरक्षा रक्षक नोंदीत होणार नाहीत असे सुरक्षा रक्षक ठेक्यातुन कायमस्वरुपी बाहेर होतील.

कोव्हिड-१९ ची संभव्या तिसरी लाट व महानगरपालिकेची आगामी निवडणुक लक्षात घेऊन सदर ठेकेदारास दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत मुद्दतवाढ देण्यात आली होती.

| अ.क्र. | सुरक्षा रक्षक पुरविण्याऱ्या एजेंन्सीचे नाव | सुरक्षा रक्षक संख्या |
|---|---|---|
| १. | मे. सैनिक इंटलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि. | ६९ |
| २. | सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा | १३५ |
| ३. | महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ | ५० |
| एकुण | | २५४ |

**ठराव निर्णय** :- मे. सैनिक इंटलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांच्या अधिनस्त असलेले ६९ सुरक्षा रक्षक हे मे. सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत होईपर्यंत मे. सैनिक इंटलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांना दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०९/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदरचे ६९ सुरक्षा रक्षक हे मे. सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा यांचेकडे नोंदीत झाल्यानंतर मे. सैनिक इंटलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि. यांचा ठेका रद्द होईल. सदर ६९ सुरक्षा रक्षकांच्या देयकावरील मासिक खर्च रक्कम रु. १०,०७,४००/- याप्रमाणे दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०९/२०२२ या ६ महिन्याच्या कालावधीकरीता होणा-या रक्कम रु. ६०,४४,४००/- एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

२०/०६

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५२९

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ०४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये कोल्ही येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये कोल्ही येथील स्मशानभूमी नादुरुस्त झालेली असून सदर ठिकाणी प्रतिक्षा कक्षासाठी व दहनासाठी असलेल्या शेडची व जोत्याची दुरावस्था झालेली असल्याने अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरीकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी सदर कामी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक करीत असल्याने अंत्यविधीसाठी नागरीकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी कोल्ही स्मशानभूमीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सबब या ठिकाणी करावयाच्या दुरुस्ती संबंधित कामाचे सन २०२१/२२ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरीता रक्कत रु. १०,४८,९५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ९० मध्ये कोल्ही येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | रु. १०,४८,९५०/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १०,४८,९५०/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

२९/०६

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसईविरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५

दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७

ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ५३०

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ०४/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महाागरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८९ मध्ये कामण येथे देवकुंडी मुख्य रस्ता ते बेलकडी पलाटपाडा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महाागरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण येथे देवकुंडी, बेलकडी परीसरात मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकवस्ती आहे. हे आदिवासी पाडे बऱ्याच वर्षापासून असून आजपर्यंत सदर ठिकाणी नागरीकांना रहदारीकरीता पक्का रस्त्याची सुविधा नसल्याने कच्च्या रस्त्याचा वापर करावा लागत आहे. पावसाळी मोसमात सदर ठिकाणी पाणी साचून रस्त्यामध्ये मोठे खड्डे होत असल्याने नागरीकांना चिखलातून ये-जा करावी लागते. परिणामी नागरीकांना तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना पावसाळ्यात येण्याजाण्यासाठी खूप त्रास होत असल्याने देवकुंडी मुख्य रस्ता ते बेलकडी पलाटपाडा रस्ता खडीकरण व डांबरीकरणाने पक्का करणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रु.४८,५४,०९६/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे ााव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महाागरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८९ मध्ये कामण येथे देवकुंडी मुख्य रस्ता ते बेलकडी पलाटपाडा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. ४८,५४,०९६/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सा २०१९-२० या वित्तिय वर्षाच्या सार्वजाीक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. ४८,५४,०९६/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

२९/०६

(अनिलकुमार पवार)

मा.आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महाागरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५३७

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ०३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण मुख्य रस्ता आश्रमशाळा ते करमुडापाडा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण मुख्य रस्ता आश्रमशाळा ते करमुडापाडा रस्ता कच्चा स्वरुपाचा व सखल जागेत असल्याने पावसाळी मोसमात सदर ठिकाणी पाणी जमा होऊन चिखल सदृश्यस्थिती निर्माण होत असते. परिणामी करमुडापाडा येथील नागरीकांना पावसाळी मोसमात येण्याजाण्यासाठी खूप त्रास होतो व रहदारीकरीता अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने सदर रस्ता खडीकरणाने व डांबरीकरणाने दुरुस्त करणे आवश्यक आहे. सबब या ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१/२२ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरीता रक्कत रु. २८,१८,७७१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये कामण मुख्य रस्ता आश्रमशाळा ते करमुडापाडा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. २८,१८,७७१/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. २८,१८,७७१/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

२९/०६

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र. ५३२** | **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक : ०४/०७/२०२२**

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये सागपाडा येथे गावदेवी मंदिर ते सागपाडा गाव व स्मशानभूमी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये सागपाडा येथे गावदेवी मंदिर ते सागपाडा गाव व स्मशानभूमी रस्ता नादुरुस्त झालेला असून जागोजागी पडलेल्या खड्ड्यामुळे नागरीकांना रहदारीकरीता त्रासाचे झालेले आहे. तसेच सदर रस्त्यावर पावसाळ्यात जागोजागी पाणी साचून चिखल सदृश्यस्थिती निर्माण होत असते. परिणामी नागरीकांना रहदारीकरीता अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने सदर रस्ता खडीकरणाने व डांबरीकरणाने दुरुस्त करणे आवश्यक आहे. सबब या ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१/२२ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरीता रक्कत रु. १२,८०,५९९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८९ मध्ये सागपाडा येथे गावदेवी मंदिर ते सागपाडा गाव व स्मशानभूमी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु. १२,८०,५९९/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १२,८०,५९९/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

३०/०६

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, विरार पूर्व, जि- पालघर पिन नं. 401 305
दूरध्वनी – 0250 -2525101/02/03/04/05/06, फॅक्स्- 0250- 2525107.
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 530

विभाग: वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग
दिनांक: 05/07/2022

**प्रस्तावाचा विषय :- राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित कृती आराखडयानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके व वाहतूक बेटे यांमध्ये शोभिवंत झाडे लागवड करुन सुशोभिकरण करणे.**

**प्रस्तावाचा मजकूर :**

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकिय रक्कम | :- | रु.८३,१३,४३५/- |
| प्रशासकिय मंजुरी आदेश | :- | मा.प्रशासकिय ठराव क्र.८८२ दि.१६/१२/२०२१ |
| तांत्रिक मान्यता | :- | मा.शहर अभियंता दिनांक १७/०१२/२०२१ |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिध्दी | :- | व.वि.श.म./वृक्षप्राधि/१४७७/२०२१ दि.२३/०२/२०२२ |
| वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक | :- | दि. २५/०२/२०२२ |
| वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक | :- | १) दै.नवभारत २) दै.नवराष्ट्र ३) दै.फ्री प्रेस जर्नरल ४) दै.लोकसत्ता |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा प्रिपरेशनची दिनांक | :- | दि.२५/०२/२०२२ पासून ते दि.२२/०३/२०२२ पर्यत रोजी दु.३.०० वा. पर्यत |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा स्विकारण्याची दिनांक | :- | दि.२४/०३/२०२२ रोजी दु.४.०० वा. पर्यत |
| विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकियेद्वारे प्राप्त निविदा | :- | ०८ |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा ) | :- | दि.२४/०३/२०२२ |
| ई- टेंडरिंग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (द्वितीय लखोटा ) | :- | दि.९/०५/२०२२ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | मा.अति.आयुक्त |

**प्राप्त निविदाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे:-**

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा | निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केप | - १७.७७ | धनाकर्ष क्र.४१९०९ दि.१७/०५/२०२२ | L-1 |
| २ | मे.हिरावती एंटरप्रायझेस | - १२.१३ | - | L-5 |
| ३ | मे.क्वालिटी सिड्स ॲन्ड नर्सरी | - १५.२१ | - | L-2 |
| ४ | मे.ओमकार एंटरप्रायझेस | - ११.४४ | - | L-6 |
| ५ | मे.अभय बी. जाधव | - १५.०० | - | L-4 |
| ६ | मे. प्रणिक एंटरप्रायझेस | - १५.०० | - | L-4 |
| ७ | मे.राम एंटरप्रायझेस | - १५.११ | - | L-3 |
| ८ | निसर्ग एंटरप्रायझेय | - ९.८५ | - | L-7 |

उपरोक्त निविदांची तुलना करता **मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केप**, हयांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा **-१७.७७% कमी दराची** असून सदरचा दर सर्वात कमी असल्याने निविदा समिती सभा दि.२८/०६/२०२२ च्या निर्णयांनुसार सदर लघुत्तम दराच्या निविदाधारकास सोबत संविधा करणेस शिफारस केलेली आहे.

सबब, वरील नमुद **मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केप** यांच्या अंदाजपत्रकापेक्षा **-१७.७७% कमी दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) / (ड) अन्वये संविदा करणेस मान्यता मिळणेकरिता मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे सविनय सादर.

## ठराव निर्णय :

१. सदर निविदेतील प्राप्त अंदाजपत्रकापेक्षा **-१७.७७% कमी** दरानुसार **मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केप** यांचेबरोबर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) / (ड)अन्वये संविदा करणेस मांन्यता देण्यात येत आहे.

२. सदर निविदाकार **मे.ॲस्थेटीक लॅन्डस्केप** यांचेबरोबर, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारित कृती आराखडयानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दुभाजके व वाहतूक बेटे यांमध्ये शोभिवंत झाडे लागवड करुन सुशोभिकरण करणे या कामाच्या व्याप्तीनुसार अटीशर्तीयुक्त करारनामा करुन कार्यादेश देण्यात यावा.

०५/०७

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. - ४०१३०५

**प्रशासकीय ठराव क्र. :** ५३१

**विभाग :- महिला व बालकल्याण**
**दिनांक :-** ०५/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय:-** सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्यीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५० % वित्तीय सहाय्य मे एस.एन.एन सर्व्हिसेस यांस अदा करणे व याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळता अस्तित्वात असलेल्या जिल्हा परिषद व खाजगी शाळांतून सुमारे २०००० ते २५००० विद्यार्थी शिक्षण घेत घेत आहेत. आपल्या घरापासून ते शाळापर्यंतचे अंदाजे २ ते ३ कि.मी. पर्यंतच्या अंतरावर विद्यार्थी दररोज पायपीट करित असतात. शाळांपर्यंत जाणे-येणेसाठी सदर मार्गावर राज्य परिवहन बससेवा उपलब्ध होत नसल्याने, विद्यार्थ्यांना शाळांपर्यंतचा प्रवास पायी किंवा वेळेला खाजगी वाहनाने करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे वेळेचा अपव्यय होत असून, त्याकामी आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. विद्यार्थ्यांच्या शालेय शिक्षणाची बाब महत्तवपूर्ण आहे. वाहनांअभावी विद्यार्थ्यांची परवड होऊ नये. याकरिता सदर शाळांतून सदरच्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी संदर्भ क्र. १ नुसार मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विद्यार्थाना बस पास देणे योग्य होईल.या बाबीचा विचार करुन महानगरपालिका हद्यीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महानगरपालिका परिवहन सेवेचा महानगरपालिकेकडून ५०% दराने विद्यार्थ्यांकरिता मोफत पास योजना राबविल्यास मुलांच्या शैक्षणिक खर्चात मदत होऊन शाळा गळतीचे प्रमाण कमी होऊ शकते.

सन २०२१-२२ या वित्तीय वर्षापासून वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेमध्ये मे एस.एन. एन सर्व्हिसेस यांना शहरातील बसेस BOOM तत्वावर चालविण्यास देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात मोफत बस पास योजनेचा लाभ देण्याकामी संदर्भ क्र. २ च्या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आलेली आहे.

**ठाणे मनपा परिवहन सेवेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येते. याधर्तीवर २०१६-१७ या वर्षापासून वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत शालेय मुलांना ५०% दराने वार्षिक मोफत बस पास योजनेचा लाभ देण्याकामी मा.सर्वसाधारणसभा ठराव क्र. २०, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये धोरणात्मक व कायमस्वरुपी राबविण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे.**

या योजनेकरीता सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्यीतील विविध शाळेतील अंदाजे ८६७७ विद्यार्थ्यांकरिता वार्षिक बस पास पुरवठा करणेकामी ३,५७,९०,८५०/- रुपये खर्च झालेला आहे. तसेच सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात कोविड-१९ मुळे सर्व शाळा बंद होत्या, मात्र माहे नोव्हेंबर, २०२१ पासून पुन्हा शाळा सुरू झाल्याने, माहे नोव्हेंबर, २०२१ ते माहे एप्रिल, २०२२ पर्यंत ३६९७ विद्यार्थ्यांना वार्षिक बस पास देण्याकामी ९३,७१,५४५/- रुपये इतका खर्च झाला आहे. सन २०१९-२० या वर्षात झालेल्या खर्चाच्या अंदाजे सरासरीनुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात माहे जून, २०२२ ते एप्रिल, २०२३ या कालावधीत विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी अंदाजे ३,७०,००,०००/- रुपये खर्च अपेक्षित आहे.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अर्थसंकल्पातून लेखा सांकेतांक ७२२-२७४१ विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना (५ % म.व.बा.क.स) या लेखाशिर्षकात ३,७०,००,०००/- रुपये तरतूद करण्यात आली आहे. तरी सदरचा खर्च या लेखाशिर्षकांतर्गत भागविण्यात येईल.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात मे एस.एन. एन सर्व्हिसेस यांच्याकडून महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषीक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) विद्यार्थ्यांना माहे जून, २०२२ ते एप्रिल, २०२३ पर्यन्त देण्यात येणाऱ्या मोफत बस पास करिता अंदाजे रक्कम रु ३,७०,००,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सादर.

---

**<u>ठराव :-</u>** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकत असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची घरे शाळेपासून २ ते ३ कि. मी अंतरापेक्षा जास्त आहेत. त्यानुसार सर्व भाषीक शाळेतील विद्यार्थ्यांना (इंग्रजी माध्यम वगळून) मोफत बस पास देण्यात यावे.

सन २०१९-२० या वर्षात सर्व भाषीक शाळेतील विद्यार्थ्यांना (इंग्रजी माध्यम वगळून) मोफत बस पास देण्याकामी झालेल्या रु. ३,५७,९०,८५०/- खर्चाच्या अंदाजे सरासरीनुसार सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात माहे जून, २०२२ ते एप्रिल, २०२३ या कालावधीत मे एस.एन. एन सर्व्हिसेस यांसकडून विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी अंदाजे रक्कम रुपये ३,७०,००,०००/- (अक्षरी तीन कोटी सत्तर लक्ष रुपये मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्याकामी व माहे जून, २०२२ ते एप्रिल, २०२३ पर्यन्त शालेय मुलांना देण्यात येणाऱ्या बस पासची रक्कम मे एस.एन.एन सर्व्हिसेस यांच्या कडून वेळोवेळी येणाऱ्या देयक मागणीनुसार मे एस.एन.एन सर्व्हिसेस यांना देयक अदा करण्याकरिता मंजूरी देण्यात येत आहे.

30/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५३२ | विभाग : आस्थापना कक्ष (४)
दिनांक : ०५/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत ६ महिन्याचे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने प्रतिक्षा यादीतील नियुक्त श्री. अनिल पावरा, क्ष-किरण सहाय्यक यांचे थकित मानधन अदा करणेस व नियुक्तीकामी निर्णय होणेस व याकामी मानधनापोटी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यांत आल्या होत्या. यानुसार महानगरपालिकेने विविध ठिकाणी कोव्हीड केअर सेंटर, क्वारंटाईन सेंटर, समर्पित कोव्हीड हेल्थ सेंटर व समर्पित कोव्हीड-१९ रुग्णालये सुरु करण्यांत आली होती. कोव्हीड-१९ विषाणूच्या संभाव्य तिसऱ्या लाटेचा धोका लक्षात घेऊन पूर्वतयारी करणे आवश्यक असल्याने तसेच नव्याने सुरु होणाऱ्या कोव्हीड-१९ रुग्णालयासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व इतर पॅरामेडिकल कर्मचारी वर्गाची आवश्यकता असल्याने मा. प्रशासकीय ठराव क्र.१३६ दि.३१/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेनुसार थेट मुलाखती घेऊन वैद्यकीय अधिकारी व इतर पॅरामेडिकल कर्मचारी यांच्या तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणुका केल्या आहेत.

श्री. अनिल जामसिंग पावरा, क्ष-किरण सहाय्यक यांच्या नियुक्तीबाबत वस्तूस्थिती खालीलप्रमाणे-

१) वैद्यकीय आरोग्य विभागाने जावक क्र.वविशम/वैआवि/६२१/२०२१ दि.३१/०५/२०२१ अन्वये महानगरपालिका संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.०१/०६/२०२१ ते दि.१५/०६/२०२१ रोजी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात आल्या होत्या.

२) वैद्यकीय आरोग्य विभागाने जावक क्र.वविशम/वैआवि/९३५/२०२१ दि.०५/०७/२०२१ अन्वये १० निवड झालेल्या क्ष-किरण सहाय्यक पदावरील उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले होते. (प्रति महिना रु.१८,७००/- ठोक मानधनावर)

३) सदरहू नियुक्ती आदेशानुसार फक्त ०९ उमेदवार हजर झाले होते. यापैकी ०१ उमेदवार हजर न झाल्याने सदरचे रिक्त पदावर कोव्हीड-१९ ची अत्यावश्यक सेवा लक्षात घेऊन मुलाखती प्रतिक्षा यादीतील उमेदवार नियुक्त करणेकामी वैद्यकीय आरोग्य विभागाची दि.१९/०७/२०२१ रोजीची टिप्पणीवर तत्कालीन प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा. उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) यांची स्वाक्षरी दिसुन येते. तथापि सदर टिपणीस मा. आयुक्त सो. यांची मान्यता मिळालेली दिसुन येत नाही.

४) कोव्हीड-१९ विषाणूच्या कालावधीत श्री. अनिल पावरा यांची दि.१९/०७/२०२१ पासुन नेमणूक करण्यात आली. परंतु वैद्यकीय आरोग्य विभागाकडुन नियुक्ती आदेश दिलेला नसल्याने करारनामा करण्यांत आलेला नाही.

५) सदरहू कर्मचारी यांच्या टिपणीस मान्यता नसतांना व कोणतेही नियुक्ती आदेश पारीत झालेला नसतानाही श्री. अनिल पावरा यांनी दि.१९/०७/२०२१ रोजी वैद्यकीय आरोग्य विभागाकडील आदेश जावक क्र.वविशम/वैआवि/१०५०/२०२१ दि.१९/०७/२०२१ अन्वये

वैद्यकीय आरोग्य विभागात हजर करुन घेणेबाबत हजर अहवाल आवक क्र.३८७४ दि.१९/०७/२०२१ अन्वये सादर केलेला आहे व रु.१००/- चा स्टॅम्प पेपर सादर केलेला आहे. तथापि करारनाम्यावर मा. उप-आयुक्त(वैद्यकीय आरोग्य) यांची स्वाक्षरी नाही.

६) श्री. अनिल पावरा यांना नियुक्ती आदेश नसताना दि.१९/०७/२०२१ ते दि.२०/१०/२०२१ या कालावधीतील मानधन वैद्यकीय आरोग्य विभागाने अदा केले आहे. यामध्ये वैद्यकीय आरोग्य विभागाची प्रशासकीय अनियमितता दिसून येते.

**७) अधिक्षक, मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा. उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) यांनी श्री. अनिल पावरा हे कोणत्या आदेशान्वये कार्यरत आहेत याबाबत शंका उपस्थित केली तथापी त्यांचे बाबत कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. श्री. अनिल पावरा यांचे नियुक्ती बाबत संभ्रम निर्माण झाल्याने अधिक्षक व मा. उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) यांचे तोंडी निर्देशान्वये दि.२१/१०/२०२१ पासुन त्यांचे मानधन रोखून ठेवण्यात आलेले आहे.**

८) तरीसुध्दा श्री. अनिल पावरा यांनी दि.२१/१०/२०२१ ते दि.२०/१२/२०२१ पर्यंत वरुण इंडस्ट्रिज कोविड सेंटर येथील हजेरी रजिस्टर वर स्वाक्षरी केल्या आहेत. याबाबत वरुण इंडस्ट्रिज कोविड सेंटरचे प्र.नियंत्रण अधिकारी हे दैनंदिन हजेरी रजिस्टर नोंदवही तपासली नसल्याचे दिसुन येते.

९) श्री. अनिल पावरा यांचे मानधन रोखुन ठेवल्याने व त्यांना हजर दिवसाचे मानधन मिळत नसल्याने सदरहू कर्मचारी दि.२१/१२/२०२१ पासुन कामावर येत नव्हते.

१०) अधिक्षक, मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा. उप-आयुक्त (वैद्यकीय आरोग्य) यांनी श्री. अनिल पावरा यांचे नियुक्ती बाबतचे प्रकरणात दिरंगाई केल्याने त्यांचा दि.२१/१२/२०२१ ते दि.३१/०५/२०२२ रोजीपर्यंतच्या कालावधीचा खंड झाला आहे.

तरी वरील नमूद बाबींवर खालीलप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक आहे.

१) श्री. अनिल पावरा, क्ष-किरण सहाय्यक यांचे कोव्हीड-१९ कालावधीतील दि.१९/०७/२०२१ ते दि.२०/१०/२०२१ या कालावधीपर्यंत त्यांना अदा केलेले मानधन रक्कम रु.५७,३४७/- इतक्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

२) दि.२१/१०/२०२१ ते दि.२०/१२/२०२१ कालावधीपर्यंत प्रति महिना रु.१८,७००/- प्रमाणे रु.३७,४००/- इतक्या मानधनापोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तथापि शासन निर्णय क्रमांक वविम-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३ दि.०९ सप्टेंबर, २०१४ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधात "क्ष-किरण सहाय्यक" हे पद मंजुर नाही. सबब त्यांची पुनश्च: "क्ष-किरण सहाय्यक" या पदावर नेमणूक करता येणार नाही.

श्री. अनिल पावरा यांचे उक्त अ.क्र.२ मध्ये नमूद थकित मानधन सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात "रुग्णालय वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.५०,००,००,०००/- इतकी तरतुद आहे. सदरचा मानधनापोटी येणारा खर्च या तरतुदीमधून भागविण्यात येईल. तरी याबाबतच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

**ठराव** :- श्री. अनिल पावरा, क्ष- किरण सहाय्यक यांच्या नियुक्तीबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

१) श्री. अनिल पावरा, क्ष-किरण सहाय्यक यांचे कोव्हीड-१९ कालावधीतील दि.१९/०७/२०२१ ते दि.२०/१०/२०२१ या कालावधीपर्यंत त्यांना अदा केलेले मानधन रक्कम रु.५७,३४७/- इतक्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.

२) दि.२१/१०/२०२१ ते दि.२०/१२/२०२१ कालावधीपर्यंत प्रति महिना रु.१८,७००/- प्रमाणे रु.३७,४००/- इतक्या मानधनापोटी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.

३) श्री. अनिल पावरा यांची क्ष-किरण सहाय्यक ह्या पदावरील सेवा दि.२१/१२/२०२१ पासुन पूर्वलक्षीप्रभावाने समाप्त करणेत येत आहे.

05/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती "आय"

## दै. बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र. ५३३ दि. ०६/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- **प्रभाग समिती "आय" वसई येथील कार्यक्षेत्रातील पापडी दै.व आठवडे बाजार दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२५ (३ वर्ष ) कालावधीकरिता ई-निविदा प्रसिध्दी करणे बाबत.**

प्रस्तावाचा मजकुर :- **प्रभाग समिती "आय"** हद्दीतील पापडी दैनंदिन व आठवडे बाजार फी वसुली कामी (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) या १५ महिन्याची ई-निविदेची किमान देकार रक्कम रु.३९,०५,६९७/- एवढी गृहीत धरुन ई-निविदा मागविण्यात आलेली असता श्री. रामकैलास यादव यांची ४२,०३,०००/- एवढया रक्कमेची (L-१) जास्त दराची निविदा प्राप्त झाली होती.

तथापि ई-निविदेस विलंब झाल्याने (दि.०१/०३/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) फक्त १३ महिन्यांची निविदेची रक्कम रु.३६,४२,६००/- होत असल्याने जास्त दराची **श्री. रामकैलास यादव** यांची ई-निविदा स्विकारणेबाबत **प्रशासकीस ठराव क्र.५१४ दि.२२/०२/२०२१** पारित करण्यात आला आहे.

**ठेकेदार श्री. रामकैलास यादव यांनी करारनाम्यामध्ये नमुद प्रमाणे मनपा फंडात जमा केलेल्या रक्कमेचा तपशिल व प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि. २१/०३/२०२२ नुसार फक्त १५ दिवसांची सुट ठेकेदार यांना देता येईल याबाबतची टिपणी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे.**

तथापि सदरच्या ई-निविदेचा कालावधी दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अतितातडीने त्यापुढील कालावधीची ई-निविदा मागविणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ मध्ये मा. स्थायी समितीने ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० रोजी महानगरपालिका हद्दीतील बाजार कर वसुलीबाबत ठराव पारित केलेला असुन तो खालीलप्रमाणे आहे.

**"बाजार फी वसुली संदर्भातील दर वाढीबाबत प्रशासनाने केलेल्या शिफारसीनूसार महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बाजार फी वसुलीचे दरांचे समानीकरण करुन नविन दर प्रस्तावित केलेले आहेत, त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच बाजार नियंत्रण व होणाऱ्या वर्दळीस अटकाव येणेकामी प्रशासनाने केलेल्या शिफारसी यांची देखिल संबंधित प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. सदर बाजाराचे वाढीव दर सन २०२०-२१ या वर्षापासून अंमलात येतील. उपरोक्त बाजारांचे वाढीव दर हे पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर प्रत्येक बाजाराचे पून:विलोकन करुन दराबाबत प्रस्तावित करावे. तसेच यासंदर्भात प्रभाग समितीच्या सर्व सहाय्यक आयुक्त यांनी आठवडे व दैनंदिन बाजाराबाबत सुचविलेल्य धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणेस ही सभा सर्वानूमते मंजुरी देत आहे."**

मा. स्थायी समितीच्या वरील ठरावाची अंमलबजावणी करावयाची असल्याने प्रभाग समिती "आय" पापडी दै. व आठवडे बाजाराची ई-निविदा सन २०२२-२३ पर्यंतच करता येईल कारण सन २०२१-२२ मध्ये दि. ०१/०३/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ (१३ महिने) कालावधीची ई-निविदा

यापुर्वीच प्रसिध्द करुन ठेकेदारा समवेत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा मा. स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० अनूषंगाने प्रति वर्ष १०% वाढ न करता सन २०२१-२२ मधील ठेक्याची वार्षिक रक्कम रु. ३३,६२,४००/- ही किमान देकार रक्कम गृहीत धरुन फक्त १ वर्षाची ई-निविदा प्रसिध्द करता येईल. तथापि त्यापुढील २ वर्ष कालावधीची ई - निविदा प्रति वर्ष १०% वाढ करुन एकूण ३ वर्ष कालावधी करीताची ई-निविदा प्रसिध्द करता येईल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मा. स्थायी समिती ठराव क्र.०२ दि.०२/०५/२०२० नूसार १०% वाढ न करता

सन २०२२-२३ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ३३,६२,४००/- एवढीच असणार आहे.

सन २०२३-२४ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ३६,९८,६४०/-

सन २०२४-२५ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ४०,६८,५०४/-

याप्रमाणे

३ वर्षाची किमान देकाराची एकूण रक्कम रु.१,११,२९,५४४/- होत आहे.

सबब वर नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (३ वर्ष) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु. १,११,२९,५४४/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तयार करण्यात आलेला असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव व त्याबाबतच्या प्रशासकीय ठरावावर स्वाक्षरी होणेस विनंती आणि सदरची ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याचा मान्यतेकरीता सविनय सादर.

निर्णय :- प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (३ वर्ष) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु. १,११,२९,५४४/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तसेच ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०८/०७

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पू.

ता. वसई जि. पालघर

---

ठराव क्र. ५३४ दि. ०६/०७/२०२२.

**प्रस्तावाचा विषय** - प्रभाग समिती 'एच' नवघर - माणिकपुर प्रभाग क्षेत्रातील दि. १६/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (२ वर्ष 8 महिने 15 दिवस) या कालावधी करीता दैनंदिन बाजार वसुलीची ई - निविदा प्रसिध्द करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** - प्रभाग समिती "एच" कार्यक्षेत्रातील दै. बाजार फी वसुली करण्याकरीता दि. ०१/१०/२०२० ते दि. ३१/०३/२०२२ (१८ महिने) या कालावधीकरीता रु. २५,००,०००/- किमान देकार धरुन ई-निविदा प्रसिध्द केली असता निविदेमध्ये एकूण ८ व्यक्ती/संस्था यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी आर. एन. एन्टरप्रायजेस यांची सर्वात जास्त दराची रु. ४५,४५,४५९/- ई-निविदा स्विकारण्यात आली.

आर. एन. एन्टरप्रायजेस यांचे समवेत **दि. १८/१२/२०२० ते दि. ३१/०३/२०२२ (१५ महिने १५ दिवस)** या कालावधीकरीता रु. ३९,१४,१५८/- (पावती क्र. ७९९२०२, ७९९२०३, ७९९२०४, ७९९२०५ दि. १७/१२/२०२० व दि. १८/१२/२०२०) रोजी डी.डी. द्वारे व सुरक्षा अनामत रक्कम रु. २,५०,०००/- (पावती क्र.७९९२०१ दि. १७/१२/२०२०) रोजी डी.डी. द्वारा महानगरपालिका फंडात जमा केलेली आहे.

दि.१८/१२/२०२० ते दि.३१/०३/२०२२ **(१५ महिने १५ दिवस)** या कालावधीकरीता ई-निविदेची रक्कम रु. ३९,१४,१५८/- होत असल्याने जास्त दराची आर. एन. एन्टरप्रायजेस यांची ई-निविदा स्विकारणेबाबत मा. आयुक्त सो. यांची दि. १०/१२/२०२० रोजी मंजुरी प्राप्त आहे.

तथापि सदरच्या ई-निविदेचा कालावधी दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अतितातडीने त्यापुढील कालावधीची ई-निविदा मागविणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ मध्ये मा. स्थायी समितीने ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० रोजी महानगरपालिका हद्दीतील बाजार कर वसुलीबाबत ठराव पारित केलेला असुन तो खालीलप्रमाणे आहे.

**"बाजार फी वसुली संदर्भातील दर वाढीबाबत प्रशासनाने केलेल्या शिफारसीनूसार महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बाजार फी वसुलीचे दरांचे समानीकरण करुन नविन दर प्रस्तावित केलेले आहेत, त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच बाजार नियंत्रण व होणाऱ्या वर्दळीस अटकाव येणेकामी प्रशासनाने केलेल्या शिफारसी यांची देखिल संबंधित प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. सदर बाजाराचे वाढीव दर सन २०२०-२१ या वर्षापासून अंमलात येतील. उपरोक्त बाजारांचे वाढीव दर हे पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर प्रत्येक बाजाराचे पून:विलोकन करुन दराबाबत प्रस्तावित करावे. तसेच यासंदर्भात प्रभाग समितीच्या सर्व सहाय्यक आयुक्त यांनी**

आठवडे व दैनंदिन बाजाराबाबत सुचविलेल्य धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणेस ही सभा सर्वानूमते मंजुरी देत आहे."

मा. स्थायी समितीच्या वरील ठरावाची अंमलबजावणी करावयाची असल्याने प्रभाग समिती "एच" दैनंदिन व आठवडे बाजाराची ई-निविदा सन २०२२-२३ पर्यंतच करता येईल कारण सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये दि. ०१/१०/२०२० ते दि. ३१/०३/२०२२ (१८ महिने) कालावधीची ई-निविदा यापुर्वीच प्रसिध्द करुन निविदेस विलंब झाल्याने दि. १८/१२/२०२० ते दि. ३१/०३/२०२२ (१५ महिने १५ दिवस)या कालावधीकरीता ठेकेदारा समवेत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तथापि दरम्यानच्या कालावधीत सन २०२१ मधील दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१ (३ महिने) या लॉकडाऊन कालावधीकरीता तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी **२ महिन्याची सुट/मुदतवाढ** देण्यास प्रशासकीय ठराव क्र. ६३२ दि. १९/०७/२०२१ रोजीनुसार तसेच दि. १६/०६/२०२१ ते दि. १५/०८/२०२१ (२ महिने) या लॉकडाऊन कालावधीकरीता तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी दै. बाजार फी वसुलीकरीता **१ महिन्याची सुट/मुदतवाढ** व आठवडे बाजाराकरीता २ महिन्यांची सुट/मुदतवाढ देण्यास प्रशासकीय ठराव क्र. ८६९ दि. १०/१२/२०२१ रोजीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानूसार ठेकेदार आर.एन. एन्टरप्रायजेस यांना दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३०/०६/२०२२ (३ महिने) या कालावधीचा मुदतवाढ देता येईल. तसेच प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि. २१/०३/२०२२ नुसार १५ दिवसांची सुट/मुदतवाढ देता येईल. **तथापि मुदतवाढ देणेपूर्वी ठेकेदार यांचेकडून दै.बा.फीची संपूर्ण रक्कम व त्यावरील २% आयकर रक्कम वसुल करणे क्रमप्राप्त आहे.**

**त्यामुळे सद्याचे ठेकेदार आर. एन. एन्टरप्रायजेस यांना एकूण ३ महिने १५ दिवसांची म्हणजेच दि. ०१/०४/२०२२ ते दि. १५/०७/२०२२ या कालावधीचा मुदतवाढ कार्यादेश देता येईल.**

दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा मा. स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० नूसार १०% वाढ न करता प्रति महिना रक्कम रु. २,५८,३५९/- (प्रति वर्ष रक्कम रु. ३१,००,३१३/-) एवढीच राहणार असून त्यानूसार ई-निविदा प्रसिध्द करता येईल.

तथापि त्यापुढील २ वर्ष कालावधीची ई - निविदा प्रति वर्ष १०% वाढ करुन एकूण ३ वर्ष कालावधी करीताची ई-निविदा प्रसिध्द करता येईल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सबब **सन २०२१-२२ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ३१,००,३१३/-** असल्याने व ठेकेदार आर. एन. एन्टरप्रायजेस यांना **दि. ०१/०४/२०२२ ते दि. १५/०७/२०२२ (३ महिने १५ दिवस) मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने** त्यापुढील कालावधीची म्हणजेच दि. १६/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (८ महिने १५ दिवस) या कालावधीची किमान देकाराची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

**सन** २०२२-२३ दि. १६/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (८ महिने १५ दिवस) कालावधीची किमान देकार रक्कम रु. २१,९६,१३५/- एवढीच असणार आहे.

**सन** २०२३-२४ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ३४,१०,३४४/-

**सन** २०२४-२५ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ३७,५१,३७८/- याप्रमाणे

३ **वर्षाची** किमान देकाराची एकूण रक्कम रु.९३,५७,८५७/- होत आहे.

सबब वर नमुद केलेप्रमाणे दि. १६/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (२ वर्ष ८ महिने १५ दिवस) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु.९३,५७,८५७/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तयार करण्यात आलेला असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव व त्याबाबतच्या प्रशासकीय ठरावावर स्वाक्षरी होणेस विनंती आणि सदरची ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याच्या मान्यतेकरीता सविनय सादर.

निर्णय - वर सादर केल्याप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच नवघर माणिकपुर कार्यक्षेत्रातील दै. बाजार फी वसुली करीता दि. १८/१२/२०२० ते दि. ३१/०३/२०२२ (१५ महिने १५ दिवस) या कालावधीकरीता नियुक्त केलेले ठेकेदार आर. एन. एन्टरप्रायजेस यांना २% **प्रमाणे होणारी** आयकर रक्कम आजतागायत महानगरपालिका फंडात जमा केलेली नसल्याने ती वसुल करणेस,

ठेकेदार आर. एन. एन्टरप्रायजेस यांना दि. ०१/०४/२०२२ ते दि. १५/०७/२०२२ (३ महिने १५ दिवस) या कालावधीचा मुदतवाढ देणेस व दि. १६/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (२ वर्ष ८ महिने १५ दिवस) या कालावधीची होणारी एकूण रक्कम रु. ९३,५७,८५७/- किमान देकार गृहीत धरुन सदरची ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेंस **व सदर कामी होणा-या अनुषंगीक खर्चास** प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

06/07

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

P/59

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती "ए"

दै. बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र. ५३५ दि.०६/०७/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय** :- दि.०१/०७/२०२२ ते दि.३१/०३/२०२५ (२ वर्ष ९ महिने) कालावधीकरीता वसई विरार शहर महानगरपालिका **प्रभाग समिती "ए"** (बोळींज) दै. व आठवडे बाजार फी वसुली ठेका पध्दतीने देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर** :- **प्रभाग समिती "ए"** (बोळींज) कार्यक्षेत्रातील दैनंदिन व आठवडे बाजार फी वसुली कामी (दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२२) या १५ महिन्याची ई-निविदेची किमान देकार रक्कम **रु.७४,८४,४००/-** एवढी गृहीत धरुन ई-निविदा मागविण्यात आलेली असता रामकैलास यादव यांची ९०,००,०००/- एवढया रक्कमेची (L-1) जास्त दराची ई-निविदा प्राप्त झाली होती.

दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ या १५ महिन्यांकरीता ई-निविदेची रक्कम रु.९०,००,०००/- होत असल्याने जास्त दराची **श्री. रामकैलास यादव** यांची ई-निविदा स्विकारणेबाबत **प्रशासकीस ठराव** क्र.२८७ दि.१७/१२/२०२० पारित करण्यात आला आहे.

**ठेकेदार श्री. रामकैलास यादव यांनी करारनाम्यामध्ये नमुद प्रमाणे मनपा फंडात जमा केलेल्या रक्कमेचा तपशिल व प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि. २१/०३/२०२२ नुसार फक्त १५ दिवसांची सुट ठेकेदार यांना देता येईल याबाबतची टिपणी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे.**

तथापि सदरच्या ई-निविदेचा कालावधी दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अतितातडीने त्यापुढील कालावधीची ई-निविदा मागविणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ मध्ये मा. स्थायी समितीने ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० रोजी महानगरपालिका हद्दीतील बाजार कर वसुलीबाबत ठराव पारित केलेला असुन तो खालीलप्रमाणे आहे.

**"बाजार फी वसुली संदर्भातील दर वाढीबाबत प्रशासनाने केलेल्या शिफारसीनूसार महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बाजार फी वसुलीचे दरांचे समानीकरण करुन नविन दर प्रस्तावित केलेले आहेत, त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच बाजार नियंत्रण व होणाऱ्या वर्दळीस अटकाव येणेकामी प्रशासनाने केलेल्या शिफारसी यांची देखिल संबंधित प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. सदर बाजाराचे वाढीव दर सन २०२०-२१ या वर्षापासून अंमलात येतील. उपरोक्त बाजारांचे वाढीव दर हे पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर प्रत्येक बाजाराचे पून:विलोकन करुन दराबाबत प्रस्तावित करावे. तसेच यासंदर्भात प्रभाग समितीच्या सर्व सहाय्यक आयुक्त यांनी आठवडे व दैनंदिन बाजाराबाबत सुचविलेल्य धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणेस ही सभा सर्वानूमते मंजुरी देत आहे."**

मा. स्थायी समितीच्या वरील ठरावाची अंमलबजावणी करावयाची असल्याने प्रभाग समिती "ए" (बोळींज) दैनंदिन व आठवडे बाजाराची ई-निविदा सन २०२२-२३ पर्यंतच करता येईल कारण सन २०२१-२२ मध्ये दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा यापुर्वीच प्रसिध्द करुन ठेकेदारा समवेत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तथापि दरम्यानच्या कालावधीत सन २०२१ मधील दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१ (३ महिने) या लॉकडाऊन कालावधीकरीता तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी २ महिन्याची सुट/मुदतवाढ देण्यास प्रशासकीय ठराव क्र. ६३२ दि. १९/०७/२०२१ रोजीनुसार तसेच दि. १६/०६/२०२१ ते दि. १५/०८/२०२१ (२ महिने) या लॉकडाऊन कालावधीकरीता तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी दै. बाजार फी वसुलीकरीता १ महिन्याची सुट/मुदतवाढ व आठवडे बाजाराकरीता २ महिन्यांची सुट/मुदतवाढ देण्यास प्रशासकीय ठराव क्र. ८६९ दि. १०/१२/२०२१ रोजीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानूसार ठेकेदार रामकैलास यादव यांना दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३०/०६/२०२२ (३ महिने) या कालावधीचा मुदतवाढ कार्यादेश दि. १७/०१/२०२२ रोजी देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा मा. स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० नूसार १०% वाढ न करता प्रति महिना रक्कम रु. ६,००,०००/- (प्रति वर्ष रक्कम रु. ७२,००,०००/-) एवढीच राहणार असून त्यानूसार ई-निविदा प्रसिध्द करता येईल.

तथापि त्यापुढील २ वर्ष कालावधीची ई - निविदा प्रति वर्ष १०% वाढ करुन एकूण ३ वर्ष कालावधी करीताची ई-निविदा प्रसिध्द करता येईल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सबब सन २०२१-२२ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ७२,००,०००/- असल्याने त्यापुढील कालावधीची किमान देकाराची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

सन २०२२-२३ दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (९ महिने) कालावधीची किमान देकार रक्कम रु. ५४,००,०००/- एवढीच असणार आहे.

सन २०२३-२४ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ७९,२०,०००/-

सन २०२४-२५ वार्षिक किमान देकार रक्कम रु. ८७,१२,०००/- याप्रमाणे

३ वर्षाची किमान देकाराची एकूण रक्कम रु.२,२०,३२,०००/- होत आहे.

सबब वर नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (२ वर्ष ९ महिने) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु.२,२०,३२,०००/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तयार करण्यात आलेला असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव व त्याबाबतच्या प्रशासकीय ठरावावर स्वाक्षरी होणेस विनंती आणि सदरची ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याचा मान्यतेकरीता सविनय सादर.

निर्णय :- प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (२ वर्ष ९ महिने) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु.२,२०,३२,०००/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तसेच ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०५/०७

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५**
**दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५० - २५२५१०७**
**ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com**

---

प्रशासकीय ठराव क्र. :- ५३६ | विभाग :- परिवहन
दिनांक :- ६/७/२०२२

**प्रस्तावाचा विषय :- JnNURM योजनेअंतर्गत मे. अशोक लेलँड कं. यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या १० बस ई-निविदा प्रक्रिया करुन निर्लेखित करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JnNURM योजनेअंतर्गत मे.अशोक लेलॅण्ड कंपनीच्या २० बस व मे. टाटा मोटर्स कंपनीच्या १० बस अशा एकूण ३० बस खरेदी केलेल्या होत्या. खरेदी केलेल्या ३० बस मा. परिवहन समिती सभा ठराव क्र. ३१ दि. १५/०५/२०१५ रोजीच्या मान्यतेने मे. भागिरथी ट्रान्स.कॉर्पो.प्रा.लि. हे रॉयल्टी तत्वावर चालवित होते. परंतु मध्यंतरी कोव्हिडं -१९च्या वाढत्या प्रादूर्भावामुळे तसेच शासनाच्या निर्देशानुसार दि. १९/०३/२०२० पासून वाहतूक सेवा बंद ठेवणेचे आदेश दिलेले असल्याने परिवहन सेवा बंद होती व पर्यायाने या बसदेखील बंद अवस्थेत होत्या.

मे. भागिरथी ट्रान्स.कॉर्पो.प्रा.लि. हे बस ऑपरेटर बस चालविण्यास असमर्थ ठरल्यामुळे महानगरपालिकेने मा. महासभेच्या निर्देशानूसार नवीन बस ऑपरेटरची नियुक्ती केलेली आहे. सदर ठेकेदारास महानगरपालिका मालकीच्या बसेस रॉयल्टी तत्वावर चालविण्यास देणेकामी परिवहन विभागाकडील बसेसचे यांत्रिकी अभियंतामार्फत सर्व्हेक्षण केले असता कोव्हिड - १९ च्या प्रादूर्भावामुळे बस विनावापर पडून राहील्यामुळे ३० बसपैकी मोठया बस २० व लहान बस १० बसमध्ये दुरुस्ती करणे योग्य राहील असा निरीक्षण अहवाल देण्यात आला.

करिता नादुरुस्त असलेल्या ३० बस तपासणी करुन मिळणेबाबत मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांना संदर्भ क्र. १ अन्वये पत्र देण्यात आलेले होते. सदर पत्रावर संदर्भ क्र. २ अन्वये मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी ३० बसपैकी २० बस वापरायोग्य असल्यामुळे दुरुस्ती करणे योग्य राहील व १० बस दुरुस्तीयोग्य नसल्याचे कळविले.

सदरच्या १० बस निर्लेखित करणेस संदर्भ क्र. ३ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. बस निर्लेखित करणेकामी बसचे मुल्यांकन करणे आवश्यक होते. करिता मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालास संदर्भ क्र. ४ अन्वये पत्र व ५ अन्वये स्मरणपत्र देऊन बसचे मुल्यांकन करुन मिळणेबाबत कळविण्यात आले. त्यानुसार मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी १० बसचे मुल्यांकन करुन बस निर्लेखित करणेकामी अंदाजित

किंमत आजच्या बाजार मुल्याप्रमाणे संदर्भ क्र. ६ अन्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बस क्रमांक | चेसीज क्रमांक | मुल्यांकन रक्कम |
|---|---|---|---|
| १ | MH ४८ C - १८२ | MB1PLEHC4EESP3432 | ५,७८,०००/- |
| २ | MH ४८ C - १८३ | MB1PLEHC0EEVVN6316 | ५,८७,०००/- |
| ३ | MH ४८ C - १८४ | MB1PLEHC4EEXN3020 | ५,५५,०००/- |
| ४ | MH ४८ C - १८६ | MB1PLEHC9EEVVN6640 | ५,६८,०००/- |
| ५ | MH ४८ C - १९० | MBIPLEHC8EEVN8523 | ५,९०,०००/- |
| ६ | MH ४८ C - २१२ | MB1PLECZEESP3431 | ५,३५,०००/- |
| ७ | MH ४८ C - २१५ | MB1PLEHC7EEWN7155 | ६,१०,०००/- |
| ८ | MH ४८ C - २१८ | MB1PLEHC9EESP3426 | ६,०८,०००/- |
| ९ | MH ४८ C - २१९ | MB1PLEHC2EEWN6303 | ५,९९,०००/- |
| १० | MH ४८ C - २२१ | MB1PLEHC6EESP3433 | ५,७८,०००/- |
| | | **एकूण** | **५८,०८,०००/-** |

तरी उपरोक्त तक्त्यातील महानगरपालिका मालकिच्या १० बस मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील प्राप्त झालेल्या मुल्यांकनानुसार निर्लेखित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी प्रशासकिय मंजूरी मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**<u>ठराव/निर्णय</u> :-** वसई विरार शहर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या JnNURM योजनेअंतर्गत मे. अशोक लेलँड कं. यांचेकडून खरेदी करणेत आलेल्या २० बसपैकी मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेल्या दि. २६/११/२०२१ च्या अहवालानुसार वापराअयोग्य असलेल्या १० बस मा. उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून दि. १७/०५/२०२२ रोजी प्राप्त झालेल्या मुल्यांकन र.रु. ५८,०८,०००/- या किमान देकारावर निर्लेखित करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

06/07

**(अनिलकुमार पवार)**

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

ठराव क्र. ५३७ | विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ६/७/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी, एच,आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर करणेत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण ९९ स्मशानभूमी अस्तित्वात आहेत. सदर स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी यापुर्वी सर्व प्रभाग सहा. आयुक्त व उप-अभियंता यांच्या अभिप्रायानुसार बांधकाम विभागात ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात आले होते. सद्यस्थितीत सदर निविदेचा कालावधी **दि. ३०/०६/२०२२** रोजी संपुष्टात येत आहे. तरी सदर स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे यापुढे देखील करणे आवश्यक व गरजेचे आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिकेतील स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणेकामी सर्व सहा.आयुक्त व सर्व उप- अभियंता ह्यांचे सद्यस्थितीतील अभिप्राय घेऊन शहरातील प्रभागनिहाय स्मशानभुमींची यादी व शिफ्ट प्रमाणे लागणारे मुनष्यबळांची संख्या त्याच्या मार्फत सादर केली असून त्यामध्ये अति आवश्यक व आवश्यक स्मशानभूमीसाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ अपेक्षित खर्च यांची माहिती पुढील प्रमाणे.

| अ. क्र. | प्रभाग समिती | स्मशानभूमींची ठिकाणे | आवश्यक मनुष्यबळ (३ शिफ्ट मध्ये) | अपेक्षित अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | A | नारिंगी स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | | आंबेडकर नगर, आगाशी स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ३ | | पूरापाडा स्मशानभूमी (ग्रामपंचायत हद्द) | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ४ | | विराटनगर स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| ५ | | विराटनगर स्मशानभूमीमधील दफनभुमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ६ | | दिवळईपाडा स्मशानभूमी, बोळिंज | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ७ | | रानपाडा स्मशानभूमी, बोळिंज | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ८ | | चिखलडोंगरी स्मशानभूमी | ०२ | रु. ४६,२७८/- |
| ९ | | डोंगरपाडा स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| १० | B | मनवेलपाडा स्मशानभूमी, विरार (पु.) | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ११ | | मोरेगाव स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| १२ | C | विरार (पू) वनोठापाडा स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| १३ | | विरार (पू) फुलपाडा स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| १४ | D | तुळींज स्मशानभूमी | १२ | रु. २,७७,६६८/- |
| १५ | | आचोळे स्मशानभूमी | ९ | रु. २,०८,२५१/- |
| १६ | | नवघर (पुर्व) स्मशानभूमी | १२ | रु. २,७७,६६८/- |
| १७ | | समेळ स्मशानभूमी, नालासोपारा (प.) | १० | रु. २,३१,३९०/- |
| १८ | | निर्मळ वैकुंठधाम स्मशानभूमी, नालासोपारा (प.) | ०३ | रु. ६९,४१७/- |
| १९ | F | धानिव तलाव स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| २० | | बिलालपाडा स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २१ | G | वालीव स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| २२ | | गोखिवरे देवीपाडा स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २३ | | गावराई स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २४ | | जुचंद्र स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २५ | | परेरानगर स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २६ | | सातीवली स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| २७ | H | दिवानमान स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| २८ | | उमेळमान स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| २९ | I | उमेळा स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | | पापडी स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ३१ | | बेणापट्टी स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| ३२ | | पाचुबंदर स्मशानभूमी | ०६ | रु. १,३८,८३४/- |
| ३३ | | पाचुबंदर दफनभूमी | ०२ | रु. ४६,२७८/- |
| ३४ | | नायगांव स्मशानभूमी | ०३ | रु. ६९,४१७/- |
| **एकुण** | | | **१५२** | **रु. ३५,१७,१२८/-** |

सदर काम राबविण्यासाठी संस्था, NGO, ट्रस्ट मंडळे, नोंदणीकृत ठेकेदार यांच्या कडून ई-निविदा मागवून स्मशानभूमींची देखभाल केल्यास उपयुक्त ठरेल.

स्मशानभूमीमध्ये नियुक्त ठेकेदारामार्फत पुढील प्रमाणे कामे करणे आवश्यक राहील.

१. स्मशानभुमीचे गेट उघडणे बंद करणे.
२. स्मशानभुमीमध्ये साफसफाई करणे.
३. स्मशानभूमीमध्ये लाईट चालू बंद करणे.
४. स्मशानभुमीमध्ये झाडे असल्यास पाण्याची व्यवस्था करणे.
५. स्मशानभुमीमध्ये आलेल्या नागरीकांना पाणी उपलब्ध करून देणे.
६. स्मशानभुमीमध्ये लाकडे रचणे.
७. स्मशानभुमीमध्ये लाकडांची नोंद घेणे, लाकडाचा साठा अद्यावत ठेवणे.
८. वैद्यकिय दाखला स्विकारून अंतविधीसाठी अनुमती देणे, प्राप्त वैद्यकीय दाखल संकलित करून रजिस्टर मध्ये नोंद ठेवणे.
९. स्मशानभुमीमध्ये स्वच्छतागृह असल्यास स्वच्छतागृह साफसफाई करणे.
१०. स्मशानभूमीच्या आतील भागाचा गैरवापर होणार नाही ह्याची दक्षता घेणे.
११. स्मशानभूमीची सुरक्षा व्यवस्था पाहणे.

सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी रक्कम **रु.३५,१७,१२८/-** एवढा मासिक खर्च अपेक्षित आहे. तसेच रक्कम रु. ४,२२,०५,५३६/- इतका वार्षिक खर्च व रक्कम **रु. १२,६६,१६,६०८/-** इतका त्रैवार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सदर कामाचा खर्च "दहन दफनभुमी सुरक्षा रक्षकासह देखभाल" या लेखाशिर्ष अंतर्गत भागविण्यात येणार आहे.

मुळ तरतूद :- रु. ४,५०,००,०००/-

या पुर्वीचा खर्च :- रु. निरंक

प्रस्तावित खर्च :- रु. ४,२२,०५,५३६/- (प्रती वर्षी)

शिल्लक :- रु. २७,९४,४६४/-

यास्तव सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरीता प्रती वर्ष अर्थसंकल्पात सदर कामाकरीता सदर लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद करण्याची तजवीज ठेवण्यात येईल.

सदर कामी वेळोवेळी तरतूदमध्ये वाढ करुन पुढील ३ वर्ष सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये सदर अपेक्षित खर्च रक्कम **रु. १२,६६,१६,६०८/-** इतक्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेकामी व सदर कामी पुढील नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन मंजूर ठेकेदारास कार्यादेश देईपर्यंत मागील निविदेस मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय मधील विविध स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये एकूण होणारा अपेक्षित खर्च रक्कम **रु. १२,६६,१६,६०८/-** इतक्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामी पुढील नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश देईपर्यंत मागील निविदेस मुदतवाढ देण्यात येत आहे.

05/07

(अनिलकुमार पवार)

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

---

ठराव क्र. ५३८ | विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक : ६/७/२०२२

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" मधील ब-हामपुर, भंगारेपाडा येथे कॉंक्रीट रस्ता, पाईप ड्रेन आणि शौचालय बांधणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 20,20,906/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

23/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्यकार्यालय विरार

**प्रशासकीय ठराव क्र. :-** ५५२ **विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**

**दिनांक :-** ०७/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी दरपत्रक मागवुन २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन्स खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर दिनांक १५ मे २०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) ची अंमलबजावणी सुरु आहे. या अभियानांतर्गत शहरे हगणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत "स्वच्छ" करणे या दोन प्रमुख बाबीचा समावेश आहे.

राज्यात नागरी घनकचरा व्यवस्थापनाकरीता आतापर्यंत उभारण्यात आलेल्या प्रकल्पावरुन असे लक्षात आले आहे की, नागरी घनकचऱ्याचे विलगीकरण न करता त्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प यशस्वी होत नाहीत. नागरी घनकचऱ्याचे विलगीकरण केल्याशिवाय घनकचऱ्यास मुल्य प्राप्त होत नाही. यास्तव नागरी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचरा निर्मितीच्या जागीच घनकचऱ्याचे विलगीकरण करणे (at source waste segregation) अत्यावश्यक आहे. यास्तव शासन परिपत्रक क्र. स्वमअ २०१७/प्र.क्र.६०/नवि.३४ दि. १६ मे २०१७ व समक्रमांक दि. २९ एप्रिल २०१७ चे शासन परिपत्रकान्वये राज्यामधील सर्व शहरांमध्ये सन २०१९-२० या कालावधीत शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segregation) करण्याची मोहीम राबविणे अनिवार्य करणेत आले आहे.

सदर घनकचरा विलगीकरण मोहीम राबविण्याबाबत शासन परिपत्रकान्वये सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने अमृत अभियानात समाविष्ट राज्यातील सर्व शहरांनी २०१९ ते २०२० अखेरपर्यंत शहरात निर्माण होणाऱ्या एकुण घनकचऱ्यापैकी ३०% घनकचऱ्याचे निर्मितीच्या जागीच विलगीकरण (at source waste segregation) करण्याची कार्यवाही करावी. याबाबत सुचना करण्यात आल्या आहेत. तथापि याबाबत नागरिकांनी कचरा निर्मितीचे ठिकाणी ओला, सुका, ई-वेस्ट व घातक कचरा घरोघरी विलगीकरण करणे गरजेचे असताना मनपाने सुध्दा त्यासाठी स्वतंत्रपणे अनुक्रम हिरवे, निळे, लाल रंगाचे कचरा डब्बे सोयायटींना पुरविणे, कचरावाहु वाहनांचे रंग त्याप्रमाणे करणे व वाहतुकीकरण केल्यानंतर क्षेपणभूमीवर स्वतंत्र जागेची उपलब्धता करणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीत अभ्यास करता वसई विरार शहर महानगरपालिकेने खालिलप्रमाणे डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत.

**खरेदी केलेल्या डस्टबीन्सची माहिती :-**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | सन | प्रति नग दर | पुरवठा केलेल्या डस्टबीन्सची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मे. मरीन इंजिनियर्स प्रा. लि. | २०१४-१५ | ४८९५/- | १५००० |
| २ | मे. निलकमल प्रा. लि. | २०१६-१७ | ३६००/- | १२६०० |
| ३ | मे. प्रायमा प्लास्टिक लि. | २०१८-१९ | १९६०/- | ९९०० |
| ४ | मे. निलकमल प्रा. लि. | २०२०-२१ | १५९९/- | १५००० |
| | | | **एकुण संख्या** | **५२५००** |

वरिलप्रमाणे कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी महानगरपालिकेने डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे लोकसंख्येत वाढ झाली आहे. लोकसंख्ये वाढीमुळे दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणत वाढ झाली आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांकडुन डस्टबीन्ससाठी मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. त्यामुळे नविन डस्टबीन्स खरेदी करणे आवश्यक आहे. नविन डस्टबीन्स खरेदी करताना सदरील डस्टबीन्सचा बाजार भाव खालिल प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव** | **प्रति नग दर** |
|---|---|---|
| १. | मे. पार्थ एंटरप्रायझेस | ३,२६०/- |
| २. | मे. निलकमल लिमिडेट | ३,२९२/- |
| ३. | मे. लक्ष्मी एंटरप्रायझेस | ३,३२०/- |

वरील प्रमाणे **मे. पार्थ एंटरप्रायझेस** यांच्या डस्टबीन्स चे दर रक्कम **रु. ३,२६०/-** प्रमाणे गृहीत धरल्यास **३०० डस्टबीन्स** साठी रक्कम **रु. ९,७८,०००/-** (अक्षरी रक्कम रु. नऊ लक्ष अठ्ठयाहत्तर हजार मात्र.) एवढा खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदी मधिल लेखा संकेतांक क्र. ३४०-४५२० साफसफाई साहित्य खरेदी **(मनपा मालमत्ता व डस्टबीन्स खरेदी) लेखाशिर्षात तरतुद ५कोटी मधुन भागविणे शक्य आहे. तरी २४० लिटर क्षमतेचा HDPE डसबीन्स खरेदी करणेस प्रशासकिय व वित्तिय मान्यता मिळण्यास पुढील** ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी दरपत्रक मागवुन २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन्स खरेदी करण्याकामी दरपत्रक मागवून होणारा अंदाजित खर्च रक्कम रु. **९,७८,०००/-** (अक्षरी रक्कम रु. नऊ लक्ष अठ्ठयाहत्तर हजार मात्र इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

०८/०८.

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ५५३

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-** ०७/०७/२०२२

**विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील कचऱ्यापासुन निर्माण होणाऱ्या दुर्गंधी वर नियंत्रण मिळविणेकामी कंपोस्ट कल्चर खरेदीसाठी दरपत्रक मागविणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व शहरातील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा उचलण्यासाठी मनपाचे कॉम्पॅक्टर, डंपर, टिपर, ट्रॅक्टर या वाहनांच्या सहाय्याने दैनंदिन ६०० ते ६५० मेट्रीक टन घनकचरा क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो. परंतु सदरील दैनंदिन घनकचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया होत नसल्याने सदरील पडीक कचऱ्याची दुर्गंधी संपुर्ण परिसरात पसरत असल्याबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर बाबत कचऱ्याची योग्य व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता मनपाचे प्रकल्प प्रस्थावीत केले आहे.

सदरील प्रकल्प उभारण्यास अंदाजे २ वर्ष कालावधी लागणार असल्याने जुन्या कचऱ्यावर कल्चरची फवारणी केल्यास सदरील कचऱ्याचे खत तयार होऊन सदर कचऱ्यापासुन निर्माण होणारी दुर्गंधी कमी होण्यास मोठया प्रमाणात मदत होणार आहे. तरी सदरील कल्चर खरेदीसाठी दर मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त दरपत्रकातील दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कल्चरचे नाव | कोटेशनधारकाचे नाव | प्रति किलो दर | GST १२% सहित | प्रति किलोसाठी होणारा एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | कल्चर कंपोस्ट पावडर | मे.रविराज केमिकल्स | रु.३३०.३६/- | रु.३९.६४/- | रु.३७५/- |
| २ | | मे.पुर्वा एजन्सी | रु.३६६.१०/- | रु.४३.९०/- | रु.४१०/- |
| ३ | | मे.शिल्पा इंटरप्रायजेस | रु.३४८.२०/- | रु.४१.८०/- | रु.३९०/- |

सदरील कोटेशनमध्ये प्राप्त कमी दर योग्य वाटत असल्याने सदरील कल्चर कंपोस्ट पावडर मागविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | कल्चरचे नाव | परिमाण/किलो | प्रति किलो दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | कल्चर कंपोस्ट पावडर | २,५०० | रु.३७५/- | रु.९,३७,५००/- |

"D:\आरोग्य\All Tender\कंपोस्ट कल्चर\ठराव.docx"

वरीलप्रमाणे २५०० किलो कंपोस्ट कल्चर खरेदीसाठी **रक्कम रु.९,३७,५००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लक्ष सदतीस हजार पाचशे मात्र)** खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय **साफसफाई जंतुनाशक खरेदी** या लेखाशिर्षा मधील तरतुद **रु.५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे. तरी कंपोस्ट कल्चर खरेदी करणेकामी दरपत्रक मागविणेस सदरील प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील कचऱ्यापासुन निर्माण होणाऱ्या दुर्गंधी वर नियंत्रण मिळविणेकामी २५०० किलो कंपोस्ट कल्चर खरेदीसाठी दरपत्रक मागवून होणाऱ्या अंदाजीत **रक्कम रु.९,३७,५००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लक्ष सदतीस हजार पाचशे मात्र)** एवढ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

06/07

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

"D:\आरोग्य\All Tender\कंपोस्ट कल्चर\ठराव.docx"

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ५५६

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-०७/०७/२०२२**

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभगाकरिता कचरा संकलना नंतर दुर्गंधी नाशक पावडर फवारणी करणेकामी दरपत्रक मागवुन दुर्गंधी नाशक पावडर खरेदी करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभगामार्फत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलनाची कामे करण्यात येत आहेत. सदरील कामांसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाने २० झोन तयार करुन २० अभिकर्त्यांची नेमणूक केली आहे. तसेच सद्यस्थितीत कचरा संकलन साठी ५५ कॉम्पॅक्टर, ११३ टिपर, ६४ डंपर, २० ट्रॅक्टर उपलब्ध असून कचरा संकलनासाठी मनपाने १५००० डस्टबीन्स खरेदी केल्या आहेत. परंतु सदरील डस्टबीन्स मधील कचरा संकलन करुन झाल्यानंतर डस्टबीन्स मधून मोठया प्रमाणात दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारी मुख्यालयात प्राप्त होत आहेत. तसेच मनपा मालकीची मासळी मार्केट, भाजी मार्केट व उघडयावर पडणारा घनकचरा या ठिकाणी दुर्गंधी येऊ नये याकरिता सदर पावडरचा वापर करण्यात येतो.

तरी सदरील ठिकाणी दुर्गंधी नाशक पावडरची फवारणी करणे करिता प्रभाग निहाय वाटप करावा लागणार आहे. तरी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता खालीलप्रमाणे दुर्गंधीनाशक पावडर खरेदी करावी लागणार आहे. तरी सदरील दुर्गंधी नाशक पावडरसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | दुर्गंधीनाशक पावडरचे नाव | प्रमाण/किलो | प्रति किलो दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | दुर्गंधीनाशक पावडर (Deodorizing cum dusting powder) | १० टन | रु.८०.१७/- | रु.८,०१,७००/- |

वरीलप्रमाणे दुर्गंधीनाशक पावडरसाठी अंदाजीत **रक्कम रु.८,०१,७००/- (अक्षरी रक्कम रु. आठ लक्ष एक हजार सातशे मात्र)** एवढा खर्च अपेक्षीत असून सदरील खर्च सन

"D:\आरोग्य\All Tender\दुर्गंधी नाशक पावडर\ठराव.docx"

२०२२-२३ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय **साफसफाई** जंतुनाशक खरेदी या लेखाशिर्षा मधील तरतुद **रु.५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे.

तरी सदरील दुर्गंधनाशक पावडर खरेदी करणेकामी दरपत्रक मागवून व होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजूरी मिळणेकामी पुढील ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता कचरा संकलना नंतर दुर्गंधी नाशक पावडर फवारणी करणेकामी दरपत्रक मागवुन दुर्गंधी नाशक पावडर खरेदी करुन होणारा अंदाजीत खर्च **रक्कम रु.८,०१,७००/- (अक्षरी रक्कम रु. आठ लक्ष एक हजार सातशे मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

06/07

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

"D:\आरोग्य\All Tender\दुर्गंधी नाशक पावडर\ठराव.docx"

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पू)., ता.वसई, जि.पालघर, पिन – ४०१ ३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/२०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई मेल – vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्र. ५५५ | विभाग – विधी

दि.०७/०७/२०२२

**प्रस्तावाचा विषय:-** मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे महानगरपालिके विरोधात दाखल याचिका क्र.३२/२०२१ मधील दि.१२/०७/२०२१ व दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेश व संयुक्त समितीचे दि.०७/१२/२०२१ रोजीचे अहवाल हे मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित करणेकामी नियुक्त पॅनल ॲड.बांसुरी स्वराज यांचेकडील प्रस्तावित दरपत्रकानुसार कामकाजनिहाय फी चे देयक अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेने घन व द्रव्य कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट न लावता पर्यावरण विषयक मापदंडाचे उल्लंघन केल्याप्रकरणी श्री.चरण भट यांनी महानगरपालिकेच्या विरोधात मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे तक्रार याचिका दाखल केलेली असून त्याचा क्र.३२/२०२१ असा आहे. सदर प्रकरणी मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी दि.१२/०७/२०२१ रोजीच्या आदेशान्वये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांची संयुक्त समितीची स्थापना केलेली आहे. संयुक्त समितीने वसई-विरार शहर प्रदेशातील पर्यावरणविषयक मापदंडाच्या अनुपालनाची स्थिती संदर्भात खातरजमा करावयाची आहे. तसेच पर्यावरण योजनेनुसार मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचे दि.१२/०७/२०२१ रोजीच्या आदेशात नमूद खालीलप्रमाणे मुद्यांचे संदर्भातील उपायात्मक कृती योजनांबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले होते;

१. सांडपाणी निर्मिती, प्रक्रिया उद्योग.
२. वैतरणा आणि पेल्हार नद्यांची पाण्याची गुणवत्ता, स्टॅटेस्टीक स्थान, रेग्युलेटरी झोन, पाणी साठ्यांचे जतन.
३. घनकचरा निर्मिती व त्यावरील प्रक्रिया, बायोमायानिंग ऑफ लिगसी वेस्ट, आग प्रतिबंधित आणि दुर्गंधीमुळे त्रास.
४. वसई-विरार मधील हवेची गुणवत्ता आणि एअर क्वॉलिटी इंडेक्स.
५. वॉटर अँड एअर ऍक्ट पूर्ततेसह औद्योगिक प्रदूषण नियंत्रण संदर्भातील मुद्दे.
६. अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम, जिल्हा समिती आणि राज्य शासनाचे पातळीवर मुख्य सचिव यांच्या मार्फत जिल्हा दंडाधिकारी पातळीवरील कृती योजनेबाबत निरीक्षण यंत्रणा.

तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दि.२५/०४/२०१९ रोजीच्या पत्रानुसार महानगरपालिकेवर आकारलेल्या प्रतिदिन दंडाची रक्कम रु.१०,५०,०००/- महानगरपालिकेने भरणा करण्याच्या पूर्ततेबाबत खातरजमा करण्याचे निर्देश संयुक्त समितीस करण्याचे निर्देश मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी दिलेले होते.

सदर आदेशाच्या अनुषंगाने संयुक्त समितीने दि.०७/१२/२०२१ रोजी आपला अहवाल मा.राष्ट्रीय हरित लवाद यांना सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) च्या दि.२५/०४/२०१९ रोजीच्या नोटीसीचे पालन झालेले नसलेचे नमूद केलेले आहे. दि.२५/०४/२०१९ रोजीच्या नोटीसीन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेने प्रतिदिन रक्कम रु.१०,५०,०००/- भरणा केलेली नाही असे समितीच्या अहवालामध्ये नमूद आहे. सदर संयुक्त समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने मा.राष्ट्रीय हरित लवाद यांचे दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेशानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेस दि.०१/०२/२०२२ रोजी प्रतिज्ञापत्र सादर करणेचे निर्देश दिलेले होते. तथापि, सदर याचिकेमध्ये मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी सुनावणीची पुढील तारीख दि.११/०५/२०२२ अशी दिलेली आहे.

तथापि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी दि.२८/०१/२०२२ रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेस पत्र पाठविलेले आहे. सदर पत्रामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी महानगरपालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत;

1. You are hereby directed to pay final compensation of Rs.113.58 Cr towards the commencement or complete the project for setting up of sewages treatment equipments or taking steps interim remediation measures to the tune of 75.0 MLD from 01/07/2020 to 27/01/2022 as directed by the honorable NGT in the aforesaid matter.

2. You shall also deposit final compensation @ Rs.10 Lakh per month from 01/04/2020 till compliances towards Solid Waste Management Rules, 2016 and compensation Rs.10 Lakh per month from April 2021 till compliance of legacy waste before 07/04/2021.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील निर्देशांप्रमाणे सात दिवसांत पुर्तता न केल्यास महानगरपालिकेविरुद्ध कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल असे उक्त पत्रात नमुंद आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) चे दि.२८/०१/२०२२ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील मा.उच्च न्यायालयाचे पॅनल ॲड.विश्वनाथ पाटील यांचेशी मा.अतिरिक्त आयुक्त (दक्षिण) यांच्या दृकश्राव्य (VC) माध्यमाद्वारे झालेल्या चर्चेनुसार ॲड.विश्वनाथ पाटील यांचा विधी अभिप्राय मागविण्यात आलेला होता. सदर प्रकरणी ॲड.विश्वनाथ पाटील यांनी दि.०८/०२/२०२२ रोजी त्यांच्या ई-मेलद्वारे त्यांचा विधी अभिप्राय दिलेला आहे. त्यात नमुंद केलेनुसार MPCB मंडळाने दिलेल्या निर्देशांचे संदर्भात मा.राष्ट्रीय हरित लवाद यांस अपिलीय अधिकार असल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दि.२८/०१/२०२२ रोजीचे पत्र हे मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे आव्हानित करावे असे अभिप्रायात नमूद आहे. तसेच मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांचे दि.१२/०७/२०२१ व दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेश व संयुक्त समितीचे अहवाल हे मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित करणे आवश्यक असल्याचे ॲड.विश्वनाथ पाटील यांनी त्यांचे अभिप्रायामध्ये नमुंद केलेले आहे.

करीता मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे दाखल याचिका क्र.३२/२०२१ मधील दि.१२/०७/२०२१ व दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेश व संयुक्त समितीचे दि.०७/१२/२०२१ रोजीचे अहवाल हे मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हानित करणेकामी महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील मा.सर्वोच्च न्यायालयाचे पॅनल ॲड.बांसुरी स्वराज यांची नेमणूक करणेस व त्याकामी होणारे देयक त्यांस अदा करणेबाबत मा.आयुक्त महोदय यांची दि.१०/०२/२०२२ रोजीची मंजुरी प्राप्त आहे.

याबाबत प्र.सहा.आयुक्त (विधी) श्री.विश्वनाथ तळेकर व विधी सल्लागार ॲड.नम्रता कश्यप यांनी महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील मा.सर्वोच्च न्यायालयाचे पॅनल ॲड.बांसुरी स्वराज यांचे समवेत भ्रमणदूरध्वनीद्वारे चर्चा केली असता तसेच कार्यालयाच्या ई-मेल व्दारे दि.२४/०३/२०२२ रोजी संपर्क साधला असता त्यांनी महानगरपालिकेच्या वतीने कामकाज करणेबाबत सकारात्मकता दर्शविलेली आहे. ॲड.बांसुरी स्वराज यांनी महानगरपालिकेच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे सदर प्रकरणी याचिका दाखल करणेकामी त्यांचे फी चे दरपत्रक ई-मेल आयडीद्वारे विधी विभागास दि.२५/०३/२०२२ रोजी कळविलेले असून ते खालीलप्रमाणे आहेत;

**For the purpose of filing the petition before the Hon'ble Supreme Court of India, following shall be the professional charges:**

1. Lump Sum Professional fees for drafting, filing, conferences and appearance before the Hon'ble Court - **Rs. 2,20,000/-**

2. Filing and other expenses and court fees **on Actuals.**

सदर कामी येणारा खर्च हा **"दावे आणि खटले फी"** या लेखाशीर्षातून भागविण्यात येणार असून सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात सदर लेखाशिर्षाअंतर्गत एकूण तरतूद रक्कम रु.१,६५,६३,०००/- इतकी आहे.

तरी मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे दाखल याचिका क्र.३२/२०२१ मधील दि.१२/०७/२०२१ व दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेश व संयुक्त समितीचे दि.०७/१२/२०२१ रोजीचे अहवाल हे महानगरपालिकेच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे आव्हानित करणेकामी नियुक्त पॅनल ॲड.बांसुरी स्वराज यांचेकडील प्रस्तावित उक्त फी दरपत्रकानुसार कामकाजनिहाय होणारे त्यांचे फी देयक अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास मंजुरीस्तव प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

..............................................................................................

**ठराव:-** सदर प्रकरणी सविस्तर चर्चा करणेत आली. मा.राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे दाखल याचिका क्र.३२/२०२१ मधील दि.१२/०७/२०२१ व दि.०७/१२/२०२१ रोजीचे आदेश व संयुक्त समितीचे दि.०७/१२/२०२१ रोजीचे अहवाल हे महानगरपालिकेच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे आव्हानित करणेकामी नियुक्त पॅनल ॲड.बांसुरी स्वराज यांचेकडील प्रस्तावित उक्त फी दरपत्रकानुसार कामकाजनिहाय होणारे त्यांचे फी देयक व सदर कामी इतर अनुषंगिक होणारा खर्च अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

06/04

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 556

विभाग :- बांधकाम
दिनांक :- 13/07/2022

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती (एफ) पेल्हार मधील मुख्य रस्त्यामधील धानिव बाग चौकाच्या काँक्रिटीकरण करणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.

**अंदाजपत्रकीय रक्कम :-** रु. ३,४४,३९,८४३/-

**प्रस्तावाचा मजकूर :-** प्रभाग समिती ( एफ ) पेल्हार मधील सोपारा फाटा ते सोपारा रेल्वे स्टेशन हा मुख्य रस्ता असुन सदरचा रस्ता हा राष्ट्रीय महामार्गास जोडला असल्यामुळे सदरच्या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये - जा असते.

सदर मुख्य रस्त्यावरील धानिव बाग हनुमान गल्ली या ठिकाणी पावसाळ्यामध्ये डोंगरावरील पाणी रस्त्यावरुन वाहत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात त्यामुळे रस्त्याची वारंवार डागडुजी करावी लागत असते सदर ठिकाणी रस्त्यावर पावसाळ्यात मोठे व खोल खड्डे पडत असल्यामुळे सदर ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही .

त्यामुळे सदर ठिकाणी कॉक्रीटीकरण केल्यास सदर ठिकाणी खड्डे पडणार नाहीत व अपघात देखील होणार नाही त्यामुळे सदर ठिकाणी ४०० मी लांबीचे व १४ मी रुंदीचे कॉक्रीटीकरण करणे गरजेचे आहे.

त्यानुसार सदर कामाचे सन २०२१-२२ च्या दरसुची नुसार रक्कम रु.३,४४,३९,८४३/- इतक्या किंमतींचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे.

**कामाचे स्वरुप :-** लांबी - ४०० मीटर
रूंदी - १४ मीटर

**यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-** सदर काम प्रथम प्रस्तावित आहे.

**लेखाशिर्ष :-** विकास निधी अंतर्गत रस्ता बांधकाम

तरी उपरोक्त कामी होणाऱ्या रक्कम रू.३,४४,३९,८४३/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर.

---

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती ( एफ ) पेल्हार मधील मुख्य रस्त्यामधील धानिव बाग चौकाच्या कॉंक्रिटीकरण करणेकामी तयार करण्यात आलेल्या रू.३,४४,३९,८४३/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे तसेच त्या अनुषंगाने येणारे इतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविण्यात याव्यात .

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

**वसई - विरार शहर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५**
**दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७**
**ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com**

---

**प्रशासकीय ठराव क्र . ५५७** **विभाग : बांधकाम विभाग**
**दिनांक: १२ /०७/२०२२**

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती एफ पेल्हार मधील मुख्य रस्त्यामधील संतोष भुवन पेट्रोलपंप ते तुळींज टोल नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती एफ पेल्हार मधील मुख्य रस्त्यामधील संतोष भुवन पेट्रोलपंप ते तुळींज टोल नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.६,६३,२५,०३५/-

प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती (एफ) पेल्हार मधील सोपारा फाटा ते सोपारा रेल्वे स्टेशन हा मुख्य रस्ता असुन सदरचा रस्ता हा राष्ट्रीय महामार्गास जोडला असल्यामुळे सदरच्या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते.

सदर मुख्य रस्त्यावरील संतोष भुवन पेट्रोलपंप ते तुळींज टोल नाका या ठिकाणी पावसाळ्यामध्ये डोंगरावरील पाणी रस्त्यावरून वाहत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात खड्डे पडतात त्यामुळे रस्त्याची वारंवार डागडुजी करावी लागत असते सदर ठिकाणी रस्त्यावर पावसाळयात मोठे व खोल खड्डे पडत असल्यामुळे सदर ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही .

त्यामुळे सदर ठिकाणी कॉक्रीटीकरण केल्यास सदर ठिकाणी खड्डे पडणार नाहीत व अपघात देखील होणार नाही त्यामुळे सदर ठिकाणी ५०० मी लांबीचे व १२.६० मी रुंदीचे कॉक्रीटीकरण करणे गरजेचे आहे.

त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक दरसुची २०२१-२२ नुसार रक्कम रु.६,६३,२५,०३५/- इतक्या किंमतींचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे.

कामाचे स्वरुप :- लांबी - ५०० मी
रुंदी - १२.६० मी

यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- सदर काम प्रथम प्रस्तावीत आहे.

जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

विकास आराखड्यातील आरक्षण :-

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- विकास निधी अंर्गत रस्ता बांधकाम

ब) मुळ तरतुद :- १०,००,००,०००/-

क) या प्रस्तावाचा खर्च :- ६,६३,२५,०३५/-

ड) शिल्लक :- ३,३६,७४,९६५/-

ई) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. १ पृष्ठ क्र. ८१

अ.क्र. १

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती एफ पेल्हार मधील मुख्य रस्त्यामधील संतोष भुवन पेट्रोलपंप ते तुळींज टोल नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,६३,२५,०३५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रीक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

१३/०७

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र:- ५५८

विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक १३/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" मधील डायानगरी, आदिवासीपाडा येथे कॉक्रीट रस्ता, पाईप ड्रेन आणि शौचालय बांधणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" मधील डायानगरी, आदिवासीपाडा येथे कॉक्रीट रस्ता, पाईप ड्रेन आणि शौचालय बांधणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. 13,98,994/-

प्रस्तावाची गरज :-वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती - एच कार्यक्षेत्रातील डायानगरी, आदीवासीपाडा येथे आदीवासी नागरीकांची लोकवस्ती आहे. मा.अध्यक्ष, आदिवासी एकता परिषद यांचे या कार्यालर्यात दि.06/03/2022 रोजी आदीवासी समाजाशी निगडीत विषयाबाबत पत्र दाखल केले आहे. याअन्वये प्रभाग समिती एच कार्यक्षत्रातील डायानगरी, आदिवासीपाडा येथे आदिवासी नागरीकांचे वास्तव्य असुन सदर आदीवासी परिसर विकसित करणेकरिता महापालिकेच्या बांधकाम विभागामार्फत परिसरात उपलब्ध नसलेल्या सोयी सुविधाची कामे करणे गरजेचे आहे.

सदर ठिकाणी नागरीकांसाठी कॉक्रीट रस्ता, तसेच सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा होणेसाठी पाईप गटार, तसेच नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छ भारत अभियांनातर्गत सार्वजनिक शौचालय बांधणे आवश्यक आहे.

कामाचे स्वरुप :- CC Pathway, Pipedrain, Toilet.

अंतर्गत कामे :- Soling, M-15 PCC, 300 mm dia, M-15 PCC, M-20 Coping, Pipel etc.....

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" मधील डायानगरी, आदिवासीपाडा येथे कॉक्रीट रस्ता, पाईप ड्रेन आणि शौचालय बांधणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 13,98,994/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र:- ५५८

विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक २३/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" वॉर्ड नं. 102 मधील मायकल हाऊस ते गोकुल नगरी पर्यत पाईप गटार बांधणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" वॉर्ड नं. 102 मधील मायकल हाऊस ते गोकुल नगरी पर्यत पाईप गटार बांधणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. 34,53,127/-

प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती-एच वॉर्ड नं.102 मध्ये मायकल हाऊस ते गोकुळ नगरी पर्यत 2 फुटी व्यासाचे पाईपड्रेन बांधण्यात आले होते. परंतु सदर पाईपड्रेन हे नादुरुस्त झालेले आहे. त्यामुळे पाणी वाहुन नेण्यास अडचण येत आहे. तसेच पावसाळयात कमी व्यासाचे पाईप असल्यामुळे पाणी जाण्यास उशीर होतो. मा.नगरसेवक व नागरीकांच्या सुचनेनुसार सदर जागेवर पहाणी करुन 3 फुट व्यासाचे पाईपड्रेनचे अंदाजपत्रक रक्कम रु. 34,53,127/-तयार करणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- पाईपड्रेन लांबी:- 210 मी
व्यास :- 3 फुट
कॉक्रीट रुंदी :- 1.50 मी

अंतर्गत कामे :- Soling, PCC, Chamber wall etc

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" वॉर्ड नं. 102 मधील मायकल हाऊस ते गोकुल नगरी पर्यत पाईप गटार बांधणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 34,53,127/- किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

13/7

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पु), जि.पालघर, पिन.नं.401 305
दुरध्वनी क्र. 2020-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - -0502525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र:- ५६० | विभाग:- बांधकाम विभाग
दिनांक १३/०७/२०२२

विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.93 मध्ये 100 फुटी रोड येथे बॉक्स कल्व्हर्ट व आर.सी. नाला बांधणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.93 मध्ये 100 फुटी रोड येथे बॉक्स कल्व्हर्ट व आर.सी. नाला बांधणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.2,03,30,464/-

प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती "एच" वॉर्ड क्र. 93 मधील 100 फुटी रोड येथे कच्चा स्वरुपाचा नाला असल्याने सांडपाणी व पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य रितीने होत नाही. पावसाळयात पाण्याचा निचरा न झाल्यामुळे पाणी रस्त्यावर साचते. साचुन राहिलेल्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी येते तसेच सदर पाण्यात जीव जंतुची निर्मिती होऊन साथीचे रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी आर.सी.सी नाला बांधणे आवश्यक आहे. जेणेकरुन सांडपाण्याचा व पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य रितीने होईल.संबंधित कामाचे सन 2021-22 वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग शासन दरसुचीनुसार कामाचे रक्कम रु. 2,03,30,464/-चे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

कामाचे स्वरुप :- 1) आर.सी.सी नाला
लांबी 50 मी
रुंदी 8.70 मी
2) आर.सी.सी बॉक्स कल्व्हर्ट
लांबी 40 मी
रुंदी 9.35 मी

अंतर्गत कामे :- Soling, PCC, Raft, Wall, Slab etc

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 67 (3) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

**ठराव** :- प्रभाग समिती "एच" मध्ये वॉर्ड क्र.93 मध्ये 100 फुटी रोड येथे बॉक्स कल्व्हर्ट व आर.सी. नाला बांधणेकामी चालु दरसुची 21-22 नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. 2,03,30,464/-किंमतीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 67(3) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन निविदा मागविणेस मान्यता देणेत येत आहे.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ५६७

दिनांक : १३/०५/२२

---

**विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.१० मध्ये बोळींज येथील बोळींज कार्यालय ते राममंदिरापर्यंत फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे काम रद्द करुन इसारा रक्कम व सुरक्षा अनामत परतावा करणेबाबत.**

**कामाचे नाव :-** **विरार (प.) प्रभाग क्र.१० मध्ये बोळींज येथील बोळींज कार्यालय ते राममंदिरापर्यंत फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविणे.**

**अंदाजपत्रकीय रक्कम :-** रु.७,२९,३९३/-

**कामाची आवश्यकता :-**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार विषयांकित कामी मा.आयुक्तांची मंजुरी दि.१४/२/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

सदर कामाच्या रु.७,२९,३९३/- इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास मा.कार्यकारी अभियंता, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडून दि.९/४/२०१५ पु.क्र.३९५/३१ अन्वये तांत्रिक मंजुरी देण्यात आली.

सदर कामासाठी दि.२७/०४/२०१५ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तरी सदर कामासाठी चार निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर कामी १% इसारा रक्कम महानगरपालिका फंडात जमा करण्यात आली आहे. सदर कामास मा.आयुक्त यांची दि.९/४/२०१५ रोजी निविदा मंजूरी घेण्यात आली आहे. तद्नंतर लघुत्तम निविदाधारक मे.हितेश दशरश संखे यांना वविशम/बांध/१८२१/१९ दि.०५/०३/२०१९ रोजी ४% सुरक्षा अनामत भरणेस कार्यलयीन पत्र देण्यात आले. त्यानुसार ठेकेदार मे.हितेश दशरश संखे यांनी ४% सुरक्षा अनामत रक्कम रु.१४,५८८/- पा.क्र.७६१४२४ दि.५/३/२०१९ अन्वये भरणा केला आहे.

सदरचे काम प्राधान्याने करावयाचे नसल्याने सदर कामाची निविदा मंजुरी नंतरची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. दरम्यान ठेकेदार मे.हितेश दशरश संखे यांनी दि.१७/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर कामाच्या निविदा दर (सन २०१३-१४ च्या DSR प्रमाणे) व प्रचलित दरामध्ये (सन २०२१-२२) तफावत असल्यामुळे सदर काम करणेस असमर्थता दर्शविलेली आहे व सदरचे काम रद्द करुन १% इसारा रक्कम व भरलेली ४% सुरक्षा अनामत परत मिळणेबाबत अर्जामध्ये नमूद केले आहे. सदर काम सद्यस्थितीत आवश्यक नसल्याने रद्द करणे उचित होईल.

तरी सदरचे काम हे होऊ न शकल्याने मे.हितेश दशरश संखे यांच्या अर्जानुसार सदरचे काम रद्द करणेकामी मान्यतेस्तव सादर.

/INIL/ C/ V.V.C.M.C/TIPPANI/ PAGE NO.58

ठराव :-

उपरोक्त कामास मा.आयुक्तांची दि.९/०४/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच निविदा दर मंजूरी मा.आयुक्त दि.१४/०२/२०१९ अन्वये घेण्यात आली आहे. सदरचे कामाच्या ठिकाणी जागेची अडचण असल्यामुळे व स्थानिक लोकांचा काम करणेस विरोध असल्यामुळे आतपर्यंत सदर काम सुरु झाले नाही. सदरचे कामाचे प्रचलित दरसूची नुसारचे दर व अंदाजपत्रकीय दर (सन २०१३-१४) यात तफावत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदार मे.हितेश दशरश संख्ये यांनी सदरचे काम रद्द करुन इसारा रक्कम व भरलेली ४% सुरक्षा अनामत परत मिळणेबाबत दि.१७/०५/२०२२ रोजी अर्ज केलेली आहे. तरी सदर काम अत्यंत आवश्यक नसल्याने रद्द करुन ठेकेदार मे.हितेश दशरश संख्ये यांना याकामी भरलेले १% इसारा रक्कम व ४% सुरक्षा अनामत परतावा करणेस मंजूरी असे.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

/INIL/ C/ V.V.C.M.C/TIPPANI/ PAGE NO.59

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ५६२

दिनांक : ९३/०७/२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये नंदाखाल येथे जेम्स लोबो यांचे घर ते बेन्सन डिमेलो यांच्या घरापर्यंत गटार बांधणे.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.९१,३८,३३४/-

३) प्रस्तावाची गरज :- वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग समिती ए विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये नंदाखाल येथे जेम्स लोबो यांचे घर ते बेन्सन डिमेलो घरापर्यंत रस्त्याजवळ पावसाळी पाण्याचा व सांडपाण्याचा निचरा व्यवस्थितरीत्या होत नाही. सदर ठिकाणी पावसाळी पाणी व सांडण्यांचा व्यवस्थीतपणे निचरा करणेसाठी गटाराचे बांधकाम करणे आवश्यक आहे. तशी मागणी स्थानिक नागरिकांनी केलेली आहे.

सदर कामी रु.९१,३८,३३४/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंर्तभूत काम :- गटार बांधकाम

परिमाण :- लांबी - २०० मी. रुंदी - २.०० मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-

६) जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- --

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ITA /Tippni/Goshwara/Tharav/Page./23

८) ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए' मधील विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये नंदाखाल येथे जेम्स लोबो यांचे घर ते बेन्सन डिमेलो यांच्या घरापर्यंत गटार बांधणे कामी रक्कम रु.९१,३८,३३४/- च्या इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी दिली आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन ई - निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

06/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ५६३

दिनांक : १३/०७/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये रुमाव आळी येथे फिलीप स्मृती बंगला ते शांती छाया बंगला पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३२,०३,४४३/-

३) प्रस्तावाची गरज :- विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये रुमाव आळी येथे फिलीप स्मृती बंगला ते शांती छाया बंगला पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे गरजेचे आहे. सदरचा रस्ता नादुरुस्त झालेला आहे. सदर रस्त्यावर खडीकरण व डांबरीकरण केल्यामुळे हा रस्ता नागरिकांना येजा करणेसाठी उपयुक्त ठरणार आहे. सदर रस्ता करणेसाठी स्थानिक नागरिकांनी मागणी केलेली आहे.

सदर कामी रु.३२,०३,४४३/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंर्तभूत काम :- खडीकरण व डांबरीकरण

परिमाण :- लांबी - २०० मी. रुंदी - ८.०० मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-

६) जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- --

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

८) ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए' मधील विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये रुमाव आळी येथे फिलीप स्मृती बंगला ते शांती छाया बंगला पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी रक्कम रु.३२,०३,४४३/- च्या इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. सदर कामी तांत्रिक मान्यता घेवून निविदा मागविणेत याव्यात.

06/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

ITA /Tippni/Goshwara/Tharav/Page.660

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी ०२५०२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०२५२५१०७
ईमेल: vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६४

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रामध्ये वसई फाटा येथे रस्त्याचे नुतनीकरण करणे (वसई फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे) कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रामध्ये वसई फाटा येथे रस्त्याचे नुतनीकरण करणे (वसई फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे) बाबत आढावा बैठकीत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मा. कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता सो. यांनी सदर प्रवेश द्वार बाबतची सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव सादर करणेस सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाच्या वसई विरार शहर महानगरपालिकेत प्रवेश करण्याच्या वसई फाटा येथे प्रवेशद्वार उभारल्यास राष्ट्रीय महामार्गावरुन महापालिका क्षेत्रात प्रवेशाची नागरिकांना माहिती होऊन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही. तरी सदर ठिकाणी तांत्रिक सल्लागार मार्फत सामूहिक स्थळ पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून कामाची रक्कम रु. १,२२,७१,८६४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' क्षेत्रामध्ये वसई फाटा येथे रस्त्याचे नुतनीकरण करणे (वसई फाटा येथे प्रवेश द्वार बांधणे). | रु. १,२२,७१,८६४/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १,२२,७१,८६४/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

(अनिलकुमार पवार)
१३/०७
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६५

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : 13/07/2022

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये मधुबन नाका ते गोखिवरे येथील पंजाब नॅशनलबॅक पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंनऑफीस मार्गे वसई फाटा व सातिवली खिंड हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगींक वसाहतीतून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील मधुबन नाका ते गोखिवरे येथील पंजाब नॅशनलबॅंक या ठिकाणी लगतच्या डोंगराळ भागातून (आचोळे डोंगरी येथून) येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून, दरवर्षी व सातत्याने रस्त्यात खड्डे पडत असलेल्या मुख्य ठिकाणी रस्त्यास कॉक्रीटीकरण करणे योग्य राहील.

त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.७,९२,३२,२६२/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९१ मध्ये मधुबन नाका ते गोखिवरे येथील पंजाब नॅशनलबॅंक पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे कामी रक्कम रू.७,९२,३२,२६२/- पर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

13/07

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६९

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ९३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७६ मधील हॉटेल ब्लू ते गोलानी नाका पर्यंतच्या रस्त्यासाठी उघाडी, साईड ड्रेन व कॉक्रीट रस्ता बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंजऑफीस मार्गे वसई फाटा हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगीक वसाहतीतून मुंबई अहमदावाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील गोलानीनाका येथील सिंडीकेट इंड. ते ब्लू हॉटेल या ठिकाणी लगतच्या डोंगराळ भागातून येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. हॉटेल ब्लू ते गोलानी नाका येथे कायमस्वरूपी उपाय म्हणून उघाडी, साईड ड्रेन व कॉक्रीट रस्ता बांधणे योग्य राहील.

तरी या अनुषंगाने पहाणी करून रिजेन्सी हॉटेल येथे उघाडी व साईड ड्रेन बांधणे तसेच हॉटेल ब्लू ते गोलानी नाका पर्यंत रस्त्यास कॉक्रीटीकरण करण्याच्या कामाचे रक्कम रू.७,४१,११,०८५/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.७६ मधील हॉटेल ब्लू ते गोलानी नाका पर्यंतच्या रस्त्यासाठी उघाडी, साईड ड्रेन व कॉक्रीट रस्ता बांधणे कामी रक्कम रू.७,४१,११,०८५/- पर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

13/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६००

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंनऑफीस मार्गे सातिवली खिंड हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगीक वसाहतीतून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील भोयदापाडा नाका येथे लगतच्या डोंगराळ भागातून येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून, दरवर्षी व सातत्याने रस्त्यात खड्डे पडत असलेल्या मुख्य ठिकाणी रस्त्यास कॉक्रीटीकरण करणे योग्य राहील.

त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.४,१४,८६,४९४/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामी रक्कम रू.४,१४,८६,४९४/- पर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

13/07

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्र. ५६५

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : १३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा मंगलम इंड.ते अगरवाल नाका पर्यंतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंनऑफीस मार्गे सातिवली खिंड हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगीक वसाहतीतून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील भोयदापाडा मंगलम इंड.ते अगरवाल नाका या ठिकाणी लगतच्या डोंगराळ भागातून येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून, दरवर्षी व सातत्याने रस्त्यात खड्डे पडत असलेल्या मुख्य ठिकाणी रस्त्यास कॉक्रीटीकरण करणे योग्य राहील.

त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.७,९३,३१,६८५/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील तील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा मंगलम इंड.ते अगरवाल नाका पर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामी रक्कम रू.७,९३,३१,६८५/- पर्यतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

13/07

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६९

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २३/०५/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील रेंजऑफीस नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंनऑफीस मार्गे वसई फाटा व सातिवली खिंड हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगीक वसाहतीतून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील रेंजऑफीसनाका या ठिकाणी लगतच्या डोंगराळ भागातून येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे व वाहतूकीच्या वरदळीमुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून, दरवर्षी व सातत्याने रस्त्यात खड्डे पडत असलेल्या मुख्य ठिकाणी रस्त्यास कॉक्रीटीकरण करणे योग्य राहील.

त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.५,६६,१७,३६१/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील रेंजऑफीस नाका येथे रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामी रक्कम रू.५,६६,१७,३६१/- पर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहीर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात यावी.

13/07

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५५०

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : १३/०७/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९० मधील सातिवली नाका, सातिवली माता-बाल संगोपन केंद्र व सातिवली तलाव या ठिकाणी रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील एव्हरशाईन सिग्नल ते रेंनऑफीस मार्गे सातिवली खिंड हा रस्ता वसई शहरास वसई पुर्वे कडील औद्योगीक वसाहतीतून मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा रस्ता आहे. सदर रस्त्यावरील सातिवली नाका, सातिवली माता-बाल संगोपन केंद्र व सातिवली तलाव या ठिकाणी लगतच्या डोंगराळ भागातून (सातिवली खिंडीतून) येत असलेल्या पावसाळी पाण्यामुळे रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग दर वर्षी विस्कळीत होत असतो व त्यामुळे रस्त्यात फार मोठया प्रमाणत खड्डे तयार होत असतात परिणामी लांबचलांब वाहतुक कोंडी निर्माण होते व यावर उपाय म्हणून पावसाळयात महानगरपालिके मार्फत खड्डयांत खडी ग्रीट (Wet mix) पसरवणे व पावसाळा संपल्या नंतर डांबरीकरणाने अस्तरीकरण करण्याचे काम हाती घेतले जाते.

दरवर्षी करावे लागणाऱ्या अस्तरीकरणा मुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा पडत असतो. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून, दरवर्षी व सातत्याने रस्त्यात खड्डे पडत असलेल्या मुख्य ठिकाणी रस्त्यास कॉक्रीटीकरण करणे योग्य राहील.

त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.२,८५,५४,६३६/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.९० मधील सातिवली नाका, सातिवली माता-बाल संगोपन केंद्र व सातिवली तलाव या ठिकाणी रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे कामी रक्कम रू.२,८५,५४,६३६/- पर्यंतच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या ईतर अनुषंगीक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

13/07

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका